वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ पाने ४ किंमत ३

# हायकोर्टानं आझाद मैदानात आंदोलनासाठी केली मनाई



## बीड जिल्हात मनाई हुकूम,अंतरवाली सराटी अन् वडीगोद्रीच्या वेशीवर पोलीस बंदोबस्त वाढवला, हालचालींना वेग

# शिंदे समितीस सहा महिन्यांची मुदतवाढ

## मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मराठा आरक्षणाचा झाला निर्णय

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

बीड ,(दिव्य न्युज):- मराठा आणि ओबीसी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून पुढील १५ दिवसांसाठी जमावबंदीचे आदेश जारी केले आहेत. सोमवारी गेवराई शहरात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांत राडा झाला होता. यावेळी हाकेंच्या गाडीवर दगडफेक झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी १४ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.घटनेनंतर जिल्हा प्रशासन अधिक सतर्क झाले असून, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्या आदेशानुसार वडीगोद्री आणि अंतरवली सराटीच्या वेशीवर ठ्उझ आणि ड्ठझऋच्या प्रत्येकी दोन कंपन्या, ५ डीवायएसपी, ८ पीआय, २६६ अधिकारी-कर्मचारी आणि १६५ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र साबळे यांनी कालच मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यामुळे चर्चेला अधिक उधाण आले आहे. याचसोबत न्यायालयाने परवानगी शिवाय आझाद मैदानावर आंदोलनास बंदी घातल्याने पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे.निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, पुढील १५ दिवस बीड जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची आंदोलने, निदर्शने किंवा मोर्चे काढण्यास बंदी घालण्यात आली आहे. पाचपेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येण्यास मज्जाव करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाची घेतलेली भूमिका यामुळे राज्यातील वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. जरांगे येत्या २९ ऑगस्ट रोजी ▶▶ पान २ वर

### याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी काय सांगितलं?

जरांगेंच्या आंदोलनाविरोधात याचिका दाखल करणाऱ्या ॲमी फाऊंडेशनचे वकील महेंद्र रत्ना यांनी सांगितलं की, या याचिकेत आमच्या मूळ मागणी अशी आहे की त्यांच्या आंदोलनाला आमचा विरोध नाही. पण त्यांचं आंदोलन मुंबईतल्या आझाद मैदानात होणार आहे, ते खूपच गर्दीचं ठिकाण आहे. या ठिकाणी सकाळी खूप मोठ्या प्रमाणावर लोक कामाला येतात कारण इथेच मंत्रालय आहे, हायकोर्ट आहे. हॉस्पिटल्स आहेत, तसंच बरीच इतर कार्यालये आहेत.

### तरीही जरांगे मुंबईच्या दिशेनं रवाना होणार

आता एकीकडं हायकोर्टानं परवानगी नसल्यानं आझाद मैदानात आंदोलनाला मनाई केली आहे. तर दुसरीकडं मनोज जरागें यांनी आंतरवली सराटीतून सांगितलं की, हायकोर्टानं आम्हाला परवानगी नाकारलेली नाही, उलट हायकोर्ट आम्हाला परवानगी देईल, याबाबत आमचे वकील अजूनही प्रयत्न करत आहेत. त्यामुळं आम्ही उद्या २७ ऑगस्ट रोजी सकाळीच मुंबईच्या दिशेनं मार्गस्थ होणार आहोत.

# त्या जल्लादी डॉ.तोडेंनी ठरविले त्या मृत महिलेच्या जिवाची किंमत २५ लाख?

## असल्या डॉक्टराचा तर परवाना रद्द करणे गरजेचे

### २५ लाख मोजून? डॉ.तोडेंना वाटत असेल की आपण निर्दोश सुटलो पण काही दिवसातच डॉ.तोडेंना याचा पश्चाताप झाल्याशिवाय राहणार नाही; स्वत:ची चुक उघड होवू नये म्हणून मृत महिलेच्या नातेवाईकांवर मोठा दबाव आणून त्या डॉ.तोडेनी आपले तोंड काळे करून घेतले

### आता आम्ही या विरूध्द आरोग्य विभाग आणि गृहविभागाकडे रितसर तक्रार दाखल करणार असून आई हॉस्पिटलच्या डॉ.तोडेंच्या काळ्या कारनाम्याचा भांडाफोंड करणार आहोत

### भिती पोटी त्या नातेवाईकांनी माघार घेतली पण डॉ.तोडेंचा सामना आता आमच्याशी

### डॉ.तोडेंच्या पाठीशी किती मोठी राजकीय शक्ती आणि कितीही मोठे गुंडांची टोळी असेल तरीही डॉ.तोडेंना आता याची शिक्षा भोगावीच लागेल










बीड, (दिव्य न्युज):- काल बीड शहरात मनाला सुन्न करणारी घटना आई या रूग्णालयाच्या डॉ.तोडेंच्या चुकीच्या उपचारामुळे घडली. एका जिवंत आणि चालत फिरत दवाखान्यात आलेली आणि मनात स्वत:ला आई बनन्याची इच्छा घेवून आलेली ती सय्यद नाझमीन फयाज हिला डॉ.तोडें यानी जिवंतच मारून टाकले. वैद्यकीय क्षेत्राला बदनाम करणारी ही घटना काल बीड शहरात घडली. त्या नाझमीनला मारून टाकून स्वत:चा जीव वाचविण्याची किंमत डॉ.तोडेंनी २५ लाखात मोजल्याची चर्चा बीड शहरात होत आहे. अशा या नाकारा आणि कमी ज्ञान असलेल्या डॉक्टराला परवानाच कसा देण्यात आला. स्वत:च्या रूग्णालयात कोणत्याच सोयी सुविधा नसतांना अशा पध्दतीने उपचार करणाऱ्या या डॉ.तोडेंना कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. आज या महिलेसोबत झाले त्याची किंमत डॉ.तोडेंनी २५ लाखात मोजली उद्या भविष्यात अशीच घटना घडली तर याला जबाबदार कोण? नाझमीन ही महिला एका गरीब कुटूंबातील होती. तिची आई ही लोकांच्या घरात जावून धुणे भांडे करायची वडील पुण्यात एका हॉटेलमध्ये काम करतात आणि एक भाऊ जो आजारी आहे अशा या अवघड परिस्थितीमध्ये राहणाऱ्या कुटूंबावर डॉ.तोडेंच्या चुकीमुळे मोठा अपघात झालेला आहे. काल डॉ.तोडें यांना वाचविण्यासाठी एकाच ▶▶ पान २ वर

### ज्या दलालांनी दलाली करून ही सेटलमेट घडवून आणली त्या दलालाचाही आता भांडेफोड करावे लागेल







बीड : आज मंगळवार रोजी बीड चे प्रसिद्ध संत हज़रत (कोचक शाह) शहींशाहवली रहे यांच्या संदल बीड शहरात थाटामाटात साजरा करण्यात आला.दर वर्षी प्रमाणे याही वर्षी ऑल महाराष्ट्र केजीएन ग्रूप च्या वतीने एसपी ऑफिस मधून संदल काळण्यात आला.पोलिस अधीक्षक कार्यालय मधून संदल निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक,बशीर गंज,कारंजा,जुना बाजार,चांदणी चौकातून दर्गा हज़रत शहींशाहवली रहे. पोहोचला. त्या नंतर अप्पर पोलिस अधीक्षक सचिन सुरेश पांडकर,पेठ पोलिस निरीक्षक अशोक मोदीराज व केजीएन ग्रूप चे संस्थापक अध्यक्ष सय्यद जहीर कादरी यांच्या हस्ते दर्ग्यावर चादर संदल फुल अर्पण करण्यात आले. त्याप्रसंगी केजीएन ग्रुपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठा आरक्षणासाठी मोठ्या संख्येने मुंबईला चला-आ.संदीप क्षीरसागर

## वाढदिवस साजरा न करण्याचे आ.क्षीरसागरांकडून आवाहन



बीड ,(दिव्य न्युज):- संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली, मराठा आरक्षणासाठी होत असलेल्या अंतिम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर माझा वाढदिवस साजरा न करता आंदोलनात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने मुंबईला चला, याच माझ्यासाठी वाढदिवसाच्या शुभेच्छा असतील. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.२७ ऑगस्ट रोजी आ.संदीप क्षीरसागर यांचा वाढदिवस आहे. त्यांचा वाढदिवसानिमित्त ▶▶ पान २ वर

# शपथ देणारे, घेणारे दोघेही बदलणार

# राज्यात विचित्र परिस्थिती



मुंबई ,(दिव्य न्युज):- नवीन राज्यपालांना मुख्य न्यायमूर्ती तर मुख्य न्यायमूर्तींना राज्यपालांकडून शपथ दिली जाते. राज्यात राज्यपाल आणि मुख्य न्यायमूर्ती दोघेही लवकरच बदलले जाणार असल्याने शपथ घेणारे आणि देणारे दोघेही एकाच वेळी बदलून जाण्याची विचित्र परिस्थिती निर्माण होणार आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे सत्ताधारी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत. ९ सप्टेंबरला निवडणूक होत असून, सत्ताधारी एनडीएकडे आवश्यक संख्याबळापेक्षा खासदारांची संख्या जास्त असल्याने राधाकृष्णन हे निवडून येणार हे निश्चित आहे.

उपराष्ट्रपतीपदाची पदभार स्वीकारण्यापूर्वी राधाकृष्णन यांना राज्यपालपदाचा राजीनामा द्यावा लागेल. परिणामी राज्यात नवीन राज्यपालांची नेमणूक होणार आहे. राज्यपालांना मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती शपथ देतात. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधें यांची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती करण्याची शिफारस न्यायवृंदाने केंद्र सरकारला केली आहे. केंद्र सरकारच्या शिफारसीनुसार राष्ट्रपतींना अधिसूचना जारी केल्यावर आरांधे हे सर्वोच्च न्यायालयात रुजू होतील. न्यायवृंदांने शिफारस केली म्हणजे लगेचच नियुक्ती होत नाही. काही वेळा केंद्र सरकार लवकर निर्णयही घेत नाही. परंतु न्या. आरांधे यांना लवकरच सर्वोच्च न्यायालयात बढती मिळणार आहे.राज्यपालांना मुख्य न्यायमूर्ती शपथ देतात. मुख्य न्यायमूर्ती उपलब्ध नसल्यास ज्येष्ठ न्यायमूर्तींकडून शपथ दिली जाते. यामुळेच नवीन राज्यपाल आले आणि तेव्हाच मुख्य न्यायमूर्ती बदलून गेले असल्यास मुख्य न्यायमूर्तींनंतर ज्येष्ठ असलेले न्यायमूर्ती राज्यपालांना शपथ देऊ शकतात.राज्यपालांनी राजीनामा दिला, निधन झाले वा त्यांना पदावरून हटविल्यास राष्ट्रपती दुसऱ्या राज्यपालांची नियुक्ती करतात. कायमस्वरुपी नियुक्तीस विलंब लागणार असल्यास शेजारच्या राज्यांच्या राज्यपालांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविला जातो. २०१४ मध्ये शंकरनारायणन यांची अन्य राज्यात राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली तेव्हा शेजातील गुजरातचे तत्कालीन राज्यपाल ओमप्रकाश कोहली यांच्याकडे सहा दिवस राज्याच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. तसेच चार वेळा राज्याच्या मुख्य न्यायमूर्तींनी राज्यपालपदाचा हंगामी कार्यभार सांभाळला आहे.

राज्यात पी. सी. अलेक्झांडर यांनी सर्वाधिक नऊ वर्षे राज्यपालपद भूषविले होते. त्याआधी अली यावर जंग हे सात वर्षे राज्यपालपदी होते. या दोघांचा अपवाद वगळता अन्य राज्यपाल पाच वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीतच राज्यपालपदी राहिले आहेत. २०१९ ते ऑगस्ट २०२५ या काळात राज्यात भगतसिंह कोश्यारी. रमेश बैस आणि सी. पी. राधाकृष्णन हे तीन राज्यपाल झाले. राधाकृष्णन यांच्यानंतर लवकरच चौथे राज्यपाल नियुक्त होतील.

# ६८० शिक्षकांना अटक होणार?

## मुख्य सूत्रधार निलेश वाघमारे याला एसआयटीकडून अटक

### माजी उपसंचालक सतीश मेंढे अजूनही फरार,शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण

मुंबई ,(दिव्य न्युज):- बोगस शालार्थ आयडी घोटाळ्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. सायबर पोलिसांनी आतापर्यंत तब्बल १,०८० शालार्थ आयडींची तपासणी केली असून यामध्ये ६८० शिक्षकांचे आयडी बोगस असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार नीलेश वाघमारे याला एसआयटीने अटक केली आहे. मात्र, प्रकरणातील महत्त्वाचा आरोपी आणि माजी उपसंचालक सतीश मेंढे अद्यापही फरार आहे. याप्रकरणी १२ मार्च रोजी सायबर पोलिसांकडे पहिल्यांदा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर तपास वेगाने सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर शिक्षकांच्या अटकेची शक्यता वर्तवली जात असून शिक्षण विभागातही यामुळे भीतीचे वातावरण आहे.



# हजरत शहेंशाहवली दर्गाहचा आज संदल तर उद्या महेफिल -ए-समा

## संदलमध्ये मोठा संख्येने सहभागी व्हा-जहीर कादरी

बीड, (दिव्य न्युज)- शहरातील हजरत शहंशाहवली दर्गाहचा संदलचा कार्यक्रम आज मंगळवार दि.२६ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केजीएन ग्रुपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा छप्परबंद संघटना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मुहम्मद जहिरोद्दिन कादरी यांनी केले आहे.बीड शहरात सूफी संत हजरत कोचक शाहवली उर्फ शहंशाहवली (रह. अ.) यांच्या संदलचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. यासाठी दि.२६ ऑगस्ट





२०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता नमाज ए असर नंतर किल्ला मैदान येथून संदल निघणार आहे. तर रात्री दहा वाजता दर्गा येथे पोहोचेल. त्यानंतर संदल चढवले जाईल. दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे नमाज ए फजर नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. त्याच दिवशी दि.२७ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता कव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केजीएन ग्रुपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा छप्पर बंद संघटना महाराष्ट्र चे प्रदेशाध्यक्ष मुहम्मद जहिरोद्दिन कादरी आणि केजीएन ग्रुपचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

# संजय आंधळे यांची भाजपा युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

वडवणी,(दिव्य न्युज):- वडवणी येथील भाजपाचे युवा नेते संजय आंधळे यांची आज भाजपा भाजपा बीड जिल्हा युवा मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



भारतीय जनता पार्टी जिल्हा बीड-युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी संजय आंधळे यांची नियुक्ती करण्यात येत आहे. भारतीय जनता पार्टीने वरिल पदाच्या माध्यमातुन त्यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे.संजय आंधळे हे भाजपाचे कार्यक्षम पदाधिकारी आहात, या जबाबदारीचे निर्वाहन समर्थपणे करून भाजपा पक्षाचे ध्येय धोरण जनते पर्यंत पोहोचवण्याचे जबाबदारी संजय आंधळे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.या पदाच्या माध्यमातुन भारतीय जनता पार्टीचे ध्येय धोरणे, मा.ना. नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारचे व मा.ना.श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र सरकारचे व लोकहितकारी निर्णय जनसामान्यांपर्यंत पोहचवत पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी आपण परिश्रम घ्याल व भाजपाची प्रतिमा जनमानसात अधिक ओजस्वी कराल याचा विश्वास ठेवून त्यांची भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याचे पत्र भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यानी दिले आहे.त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी शेख इर्शाद यांची निवड

## पक्षाच्या नेत्या पंकजाताईंनी दिली इर्शाद भाईंवर मोठी जबाबदार

बीड, (दिव्य न्युज):- बीड येथील भाजपाचे युवा नेते शेख इर्शाद भाई यांची आज भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली तसे निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी काढले आहे. आज बीड जिल्ह्यात जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष, जिल्हा अनु.जाती-जमाती मोर्चा अध्यक्ष, जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष आणि जिल्हा किसान मोर्चा अध्यक्षांची निवड करण्यात आली. मागील अनेक वर्षापासून भाजपाच्या नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचे खंदे समर्थक म्हणून काम करणारे इर्शाद भाई यांच्यावर आज पक्षाने मोठी जबाबदारी टाकत त्यांची भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे. या मिळालेल्या मोठ्या जबाबदारीला आता इर्शाद भाई यांना मोठ्या कौशल्याने पक्षाच्या ध्येय धोरण आणि पक्षात अल्पसंख्यांक समाजाला जोडण्याची जबाबदारी आली आहे. इर्शाद भाई हे बीड जिल्ह्यात भाजपाचे कार्यक्षम पदाधिकारी आहेत. या मिळालेल्या जबाबदारीचे निर्वाहन समर्थपणे करून



भाजप पक्षाचे ध्येयधोरण जनतेपर्यंत पोहंचविण्याची जबाबदारी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेख बावनकुळे आणि राज्याच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी इर्शाद भाई यांना दिली आहे. आज सकाळी सोशल माध्यमांवर पक्षाच्या वतीने पत्र प्रसिध्द करण्यात आले. त्यामध्ये पक्षाचे विविध पदांची निवड करण्यात आलेली आहे. इर्शाद भाई यांना मिळालेली ही मोठी जबाबदारीअसून आता आगामी जि.प., पं.स. आणि नगर पालिका निवडणुकीत अल्पसंख्याक समाजाला जास्तीत जास्त प्रमाणात पक्षाला जोडून देण्याची जबाबदारी आली असून इर्शादभाई आपली जबाबदारी समजून पक्षाच्या नेत्याचा विश्वास पूर्ण करतील.









पान ४ वरून

## लक्ष्मी नगर मधील

टाकून जातात रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. लहान लहान मुलांना खेळण्यासाठी जागा उपलब्ध नाही. पडलेला कचरा खाण्यासाठी मोकाट जनावरांचा वावर वाढली आहे. या रस्त्यावर नियमित घंटागाडी येत नाही. नगरपालिकेचे झाडूवाले झाडू मारण्यासाठी फिरकतही नाहीत. भाजी विक्रेते घराच्या समोरच बसल्यामुळे घरात येजा करणे देखील येथील नागरिकांना मोठ्या अवघड झाले आहे .या सर्व समस्यांना लक्ष्मीनगर मधील नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व त्रासाला कंटाळून लक्ष्मी नगर मधील नागरिकांनी दीड महिन्यापूर्वी या ठिकाणावरून मंडई स्थलांतरित करावी यासाठी नगरपालिकेला निवेदन दिले होते. परंतु नगरपालिकेकडून कुठलीच आज पर्यंत कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे आज पुन्हा लक्ष्मी नगर मधील नागरिकांनी थेट मुख्याधिकारी सौ. पुष्पगंधा भगत मॅडम यांचे कार्यालय गाठत त्यांना पुन्हा एकदा निवेदन दिले नागरिकांच्या समस्या ऐकल्यानंतर मुख्याधिकारी भगत मॅडम यांनी मला सात दिवसाची वेळ द्या मी ही मंडई दुसरीकडे स्थलांतरित करते असे आश्वासन दिले आहे.

कोर्टाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भाजीची दुकाने, फळांच्या हातगाड्या लागलेल्या असतात. त्यामुळे परिसराला मंडईचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या परिसराच्या चारही बाजूंचे रहिवासी येथील रस्त्यावर भाजी खरेदीसाठी येतात. त्यांची संख्या मोठी आहे ग्राहकांच्या संख्येत दिवसेंदिवस जशी भर पडत आहे तशी ती भाजी विक्रेत्यात झाली आहे. भाजी विक्रेते भाजी विकून झाल्यावर राहिलेला कचरा रस्त्यावर टाकत असल्याने येथे दुर्गंधी पसरत आहे व त्यामुळे अस्वच्छतेचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. रवींद्र भोस, दीपक तरटे, प्रशांत साबळे, प्रशांत तरटे, राहुल दळवी, सुनील बसी, किशोर चाकणे, संजय कसरे, संभाजी वनपुरे, शहारामीरकळ, चव्हाण निखिल, सोनवणे काशिनाथ, गायत्री ढवळे, सुषमा कसरे, सविता भोस, साक्षी तरटे, बसे भाभी, शुभांगी चाकणे यांच्यासह लक्ष्मी नगर येथील नागरिक मोठ्या संख्येने नगरपालिकेत उपस्थित होते.

पान १ वरून

## हायकोर्टानं आझाद

मुंबईत येऊन हे उपोषण चालू करणार आहेत. मात्र न्यायालयाने त्यांना मुंबईत येण्यास मनाई केल्यानंतर वातावरण जास्तच तापले आहे. असे असतानाच आता समोर मोठी माहिती समोर आली आहे. आज (२६ ऑगस्ट) झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मराठा आरक्षण आणि त्यासाठी चालू असलेल्या प्रक्रियेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयांबाबत मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी माहिती दिली आहे.

मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडल्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी बोलताना, मनोज जरांगे यांनी हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटमधील नोंदीनुसार आम्हाला ओबीसी प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी जरांगे यांची आहे. याबाबत आजच्या बैठकीत चर्चा झाली. कायदेशीर प्रक्रिया चालू आहेत. हैदराबाद गॅझेटच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीस मुदतवाढ द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. या समितीला आता आणखी सहा महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे हैदराबादच्या गॅझेटचा अभ्यास करून त्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. कारण ही प्रक्रिया क्लिष्ट आहे. जरांगे यांनीच केलेल्या मागणीनुसार शिंदे समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे, असे राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.

मला वाटतं जरांगे यांची जी लढाई चालू आहे, त्याबाबत आम्ही चर्चा केली आहे. सर्वांचीच भूमिका सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्यात आले होते. महाविकास आघाडीला हे आरक्षण टिकवण्यात अपयश आले. पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आले. या सरकारने पुन्हा मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण अजूनही टिकूनही आहे. आरक्षणाच्या बाबतीत शासनाची कोणतीही नकारात्मक भूमिका नाही. फक्त कायद्याच्या चौकटीत बसवून हे काम करावे लागेल, असेही राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा पेटला आहे. मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्टपासून मुंबईत बेमुदत उपोषण करण्याची घोषणा केल्याने वातावरण ढवळून निघाले. मात्र न्यायालयाने त्यांना मुंबईत येण्यास मनाई केली आहे. या पार्श्वभूमीवर आज (२६ ऑगस्ट) झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या प्रक्रियेबाबत चर्चा करून शिंदे समितीस सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयामुळे गॅझेटचा सखोल अभ्यास करून पुढील दिशा ठरवली जाणार असल्याची माहिती बैठकीचे अध्यक्ष व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

विखे पाटील म्हणाले की, मनोज जरांगे यांनी सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेटमधील नोंदींनुसार ओबीसी प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी केली आहे. या संदर्भात शिंदे समिती काम करत आहे. प्रक्रिया क्लिष्ट असल्याने समितीला मुदतवाढ देण्याची गरज होती. त्यामुळे आता सहा महिन्यांत समिती सविस्तर अभ्यास करून निर्णयासाठी आपला अहवाल सादर करेल.बैठकीत कायदेशीर बाजू, न्यायालयीन निर्णय आणि समाजाच्या अपेक्षा या सगळ्यांचा विचार करून चर्चा झाली. सरकार सकारात्मक भूमिकेत असून, मराठा समाजाला न्याय देण्याबाबत कोणताही नकारात्मक दृष्टिकोन नाही, असेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पूर्वी मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले होते. मात्र ते टिकवण्यात माजी महाविकास आघाडी सरकार अपयशी ठरले. आता पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्याने आरक्षणाच्या मुद्द्यावर ठोस भूमिका घेतली जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मनोज जरांगे यांच्या उपोषणामुळे राज्यात तणाव वाढण्याची शक्यता आहे. मात्र सरकार व न्यायालयाच्या निर्णयाच्या चौकटीत राहूनच समाजाला न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे मंत्रिमंडळ उपसमितीने अधोरेखित केले.

## मराठा आरक्षणासाठी

विविध उपक्रम आणि कार्यक्रम घेऊन कार्यकर्ते वाढदिवस साजरा करत असतात. परंतु यावर्षी मराठा समाजाला आरक्षण मिळविण्यासाठीची ही शेवटची लढाई आहे. त्यामुळे माझा वाढदिवस साजरा न करता, सध्या संपूर्ण लक्ष आंदोलनावर ठेवून त्यासाठी जोमाने परिपूर्ण तयारी करा आणि संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे होत असलेल्या ऐतिहासिक आंदोलनास बहुसंख्येने, एकजूटीने मुंबईला चला. याच माझ्या वाढदिवसाच्या मला शुभेच्छा असतील. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## त्या जल्लादी डॉ.तोडेंनी

समाजातील दहा ते पंधरा डॉक्टर, डॉक्टरांची कोणतीच चुक नाही असे म्हणत डॉक्टरला शेवटपर्यंत वाचविण्याच्या प्रयत्नात दिसून येत होते पण नातेवाईकांचा आक्रोष आणि संताप पाहून ते पुढील रणनिती ठरविण्याच्या नादात होते. जेव्हा नातेवाईकांनी त्या मृत महिलेचे शव एसपी ऑफिस मध्ये नेण्यात आले तेथून ते शव जिल्हा रूग्णालयात आणण्यात आले तिथे मृत महिलेच्या आईने माझ्या मुलीचा शवविच्छेदन हे औरंगाबादच्या घाटी रूग्णालयात करण्याचा अर्ज दिला तेथूनच या डॉक्टरांनी राजकीय वजन वापरायला सुरूवात केली आणि नातेवाईकांवर गुंडांच्या टोळीचा वापर सुरू केला. जिल्हा रूग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सकांनी या मृत महिलेचे शवविच्छेदनाचा खेळ खेळायला सुरू केला. आम्हाला औरंगाबादला पाठविता येत नाही. तुम्हाला याचे शवविच्छेदन अंबाजोगाईच्या रूग्णालयात करावे लागेल पण सीएस वर दबाव वाढताच सीएसने औरंगाबादला घेवून जावे मी तसे पत्र देतो असे सांगितले. हे ऐकताच डॉक्टरांनी मग नातेवाईकांवर दबाव तंत्राचा वापर सुरू केला आणि या दबावामुळे नातेवाईक दाबले गेले आणि चक्क डॉक्टरांनी त्या मृत महिलेच्या कारवाईपासून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी २५ लाखांची रोकड मोजल्याची चर्चा जिल्हा रूग्णालयाच्या परिसरात होत होती. डॉ.तोडें तुम्ही २५ लाख मोजून सुटले असे वाटून घेवू नका आता तुमचे सगळे भोडेफोड दिव्य वार्ता करणार आहोत. याबाबत आम्ही आता राज्याच्या आरोग्य विभागासह राज्याच्या गृह विभागाला सर्व पुराव्यानिशी आणि फोनवर झालेल्या चर्चांच्या आधारे रितसर तक्रार करून डॉ.तोडेंचे तोड काळे केल्याशिवाय स्वस्त बसणार नसून या विषयाचा संपूर्ण पुराव्यानिशी वृत्त पुढील अंकात वाचावे...